# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping distressed Persons**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **03/02/2023**

**Brief of the work done :-**

मुलीच्या लग्नासाठी बँकेतील गहाण सोने सोडवून घरी परत जात असताना गरीब शेतकऱ्याची हरवलेली सोने व पैसे असलेली थैली नारळपाणी विक्रेत्याने परत केली. या प्रामाणिक कार्याचा गौरव SP श्री. बच्चन सिंह (भा.पो.से.) यांच्याहस्ते सत्कार करून करण्यात आला.

# कांदा-लसून विक्रेत्याचा असाही प्रामाणिकपणा

## लाखोंचे दागिने व रक्कम केली परत; शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर उमटले हास्य

वाशीम, दि. २ (प्रतिनिधी)



कुटुंबात लग्नकार्य असल्याने बँकेत तारण ठेवलेले दागीने सोडवून व काही रोख रक्कम ठेवलेली पिशवी कांदा, लसून विक्रेत्याच्या दुकानवर शेतकरी विसरला. मात्र, या व्यावसायिकांने प्रामाणिकतेचा परिचय देत सदर दागीने व रोकड असलेली पिशवी शेतकऱ्यास परत दिली. सुमारे पाच लाखाचा मुद्देमाल परत मिळाल्याने शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य तरळल्याचे दिसून आले तर व्यावसायिकाच्या या कृतीचे सर्वच स्तरातून कौतूक केल्या जात आहे.

अधिक माहितीनुसार, तालुक्यातील एरंडा येथील शेतकरी रमेश घुगे यांच्या कुटुंबात लग्न कार्य असल्याने त्यांनी बँकेत तारण ठेवलेले ७७ ग्रॅम सोने सोडविले व ३५ हजार रुपये काढली. सदर सोने व रक्कम एका पिशवीत ठेवून गावी जात असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील एका दुकानावर कांदा, लसून घेण्यासाठी थांबले असता रोकड व दागीने असलेली पिशवी तेथेच विसरली.मात्र, व्यावसायिक शे. जाहेद हाजी अ. गफूर यांना सदर पिशवी दिसून आल्याने त्यांनी ती ठेवून दिली. दरम्यान, शेतकरी घुगे यांनी सर्वत्र शोधाशोध घेवून पिशवी सापडत नसल्याने पोलिसात तक्रार दिली. दोन दिवस उलटूनही सदर पिशवी मागणारा आला नसल्याने जाहेद यांनी पोलीस स्टेशन गाठून या घटनेची माहिती ठाणेदार रफीक शेख यांना दिली. त्यानुसार, पोलिसांनी शेतकरी रमेश घुगे यांचा शोध घेवून त्यांना माहिती देवून बोलावून घेतले. सदर दागीने व व रोख ३५ हजार असा ५ लाखांचा मुदेमाल जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या हस्ते रमेश घुगे यांच्या सुपूर्द करण्यात आली. हरवलेले दागीने व रक्कम परत मिळाल्याने शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य तरळले. कांदा, लसून विक्रेत्याच्या या कृतीमुळे समाजात अजूनही प्रामाणिकपणा शिल्लक असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.